


YCM रुग्णालयातील पदव्युत्तर एम.डी./एम.एस.परीक्षेचा निकाल जाहीर

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in    शनिवार दिनांक १७/05/२०२5    METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 108 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# खेलो इंडिया युवा स्पर्धेत महाराष्ट्राची विजेतेपदाची हॅट्रिक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई - 'भले शाब्बास!, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर आपण सर्वांनी महाराष्ट्राच्या क्रीडा गौरवात आणखी भरच घातली आहे. या यशामुळे आपण सर्व खेळाडू महाराष्ट्राचा अभिमान आहात,' अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खेलो इंडिया युवा स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपदाची हॅट्रिकचा पराक्रम साधणाऱ्या महाराष्ट्राच्या चमुतील खेळाडुंचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सर्वोत्तम कामगिरी करीत ५८ सुवर्ण, ४७ रौप्य, ५३ कांस्य अशी एकूण १५८ पदकांची लयलूट केल्याबद्दल मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी अत्यंत आनंद झाल्याचे नमूद केले आहे.

तसेच या ७ व्या खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राने तब्बल ९ स्पर्धा विक्रमांचा पराक्रमही नोंदविणे अभिमानास्पद असल्याचे म्हटले आहे.

ग्रामीण भागांतून येणाऱ्या खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे, त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर जाण्यासाठीची प्रेरणा मिळावी यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'खेलो इंडिया स्पर्धा' 2018 पासून सुरू झाली. या स्पर्धेत आतापर्यंत महाराष्ट्राने पाचव्यांदा विजेतेपदावर आपले नाव कोरणे ही बाब आपल्या ग्रामीण भागातील खेळाडूंच्या गुणवत्तेची चुणूक दाखवणारी आहे.

या स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडू, त्यांचे प्रशिक्षक, मार्गदर्शक आणि खेळाडूंच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहिलेल्या त्यांच्या कुटुंबीयांचे देखील कौतुक करावे तितके थोडेच आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी भावना व्यक्त केल्या आहेत.

तसेच या सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

KHELO INDIA

# सौरऊर्जेच्या माध्यमातून वीज उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न - अजित पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




बारामती : राज्यात पीएम-सूर्य घर : मोफत वीज योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करुन सौरऊर्जेच्या माध्यमातून वीजनिर्मितीवर भर देण्यात येत आहे, आगामी काळात नागरिकांच्या वीज देयकात बचत करण्याच्यादृष्टीने दिवसा वीज उपलब्ध करुन देण्यास राज्य शासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

मुढाळे येथे महापारेषणच्या २२०/३३ के.व्ही. उपकेंद्राच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महापारेषणचे मुख्य अभियंता अनिल कोळप, महावितरणचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर, अधीक्षक अभियंता संदीप हाके, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, तहसीलदार गणेश शिंदे, गट विकास अधिकारी अनिल बागल, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपअभियंता राजकुमार जाधव, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक संभाजी होळकर, बारामती सहकारी बँकेचे अध्यक्ष सचिन सातव, माळेगाव सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ॲड. केशवराव जगताप आदी उपस्थित होते.

पवार म्हणाले, ग्रामीण भागातील उद्योजक, शेतकरी आणि घरगुती वापराकरिता लागणारी वीज तसेच राज्यातील वाढते औद्योगिकरण लक्षात घेता सर्व घटकांना योग्य दाबाने वीजपुरवठा झाला पाहिजे याकरीता शासनाच्यावतीने वीजेचे उपकेंद्र उभारण्यात येत आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध व्हावी याकरीता याकरीता सुमारे २४ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. शेतात सौर कृषी पंप देण्यात येत आहेत. शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती पर्यंतच्या कृषी पंपाना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला असून सुमारे ४४ लाख शेतकऱ्यांना लाभ घेतला आहे.

पीएम-सूर्य घर : मोफत वीज योजनेअंतर्गत १ लाख ३० हजार घरांच्याकरीता ५०० मेगॅवटपेक्षा अधिक क्षमतेचे छतावर सौरसंच बसविण्यात आले आहेत तसेच या योजनेअंतर्गत १ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक अनुदान लाभार्थ्यांना दिले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरकुलांनाही सोलरच्या माध्यमातून वीज उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्तेच्या (एआय) वापरासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. यासर्व प्रयत्नामुळे वीजेच्या देयकात बचत होण्यास मदत होईल.

# महानगर पालिका निवडणुक चार महिन्यात




## शहरातील राजकीय पक्षांची स्थिती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुका चार महिन्यात घेण्यात याव्या असे आदेश सर्वोच्च न्यायालयाच्या वतीने राज्य सरकार व राज्य निवडणूक आयोग यांना सहा मे रोजी देण्यात आले. त्यामुळे आता बऱ्याच वर्षापासून रखडलेल्या महानगरपालिकेच्या निवडणुका सप्टेंबर महिन्यात होणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. या महानगरपालिकांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या पिंपरी चिंचवड शहरातील काही महत्वाचे राजकीय पक्ष यांची शहरात किती ताकद आहे या लेख च्या माध्यमातून आपण थोडक्यात जाणून घेणार आहोत .

महानगरपालिका निवडणुका आता चार महिन्यात होतील. मागील मार्च 2022 पासून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची निवडणूक रखडली आहे या तीन,साडेतीन वर्षात अनेक राजकीय घडामोडी घडल्या राष्ट्रवादी पक्षाचे दोन राष्ट्रवादी झाले तसेच शिवसेनेचे दोन शिवसेना झाले. याचा परिणाम पिंपरी चिंचवड शहरातही झाला पिंपरी चिंचवड शहरातही राष्ट्रवादी अजित पवार गट व राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व शिवसेना शिंदे गट पक्ष असे राजकीय पक्षांचे स्वरूप झाले आहे.

पिंपरी चिंचवड शहरात 2017 मध्ये माजी आमदार तथा माजी शहराध्यक्ष स्वर्गीय लक्ष्मण जगताप यांच्या सक्षम नेतृत्व मुळे भारतीय जनता पक्षाचे निर्विवाद वर्चस्व सिद्ध झाले.

पिंपरी चिंचवड शहरात भारतीय जनता पक्षाची ताकद मोठी आहे. भोसरी विधानसभा मतदारसंघात भाजपचे आमदार महेश लांडगे, चिंचवड विधानसभा मतदारसंघात भाजपचे आमदार शंकर जगताप तसेच शहरात विधान परिषद सदस्य आमदार उमाताई खापरे व आमदार अमित गोरखे हे चार आमदार शहरात आहेत तसेच माजी नगर सेवक , पदाधिकारी यांची संख्या हि मोठी आहे त्या मुळे भारतीय जनता पक्ष पिंपरी चिंचवड शहरात मोठा पक्ष आहे. मागील महानगरपालिका निवडणुकीत भाजपचेच सर्वात जास्त नगरसेवक निवडून आले होते व पाच वर्षे भाजपची सत्ता राहिली आहे.

मागील वर्षी झालेली लोकसभा निवडणूक असो किंवा यावर्षीची विधानसभा निवडणूक असो भारतीय जनता पक्ष हा पिंपरी चिंचवड शहरात एक नंबर वर राहिलेला पक्ष आहे चिंचवड विधानसभा मतदारसंघात तसेच भोसरी विधानसभा मतदारसंघात भाजपचे आमदार मोठ्या मताधिक्याने निवडून आले चिंचवड विधानसभा मतदारसंघात शंकर जगताप तर भोसरी विधानसभा मतदारसंघात महेश लांडगे यांनी लाखोच्या संख्येने मतदान घेऊन भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहरात किती सक्षम आहे हे दाखवून दिले आहे. तसेच चिंचवड विधानसभा मतदारसंघ,पिंपरी विधानसभा मतदारसंघ व भोसरी विधानसभा मतदारसंघ या पिंपरी चिंचवड शहरातील तीनही विधानसभा मतदारसंघात भाजपची सदस्य संख्या इतर राजकीय पक्षाच्या तुलनेने जास्त आहे.त्यामुळे आता आगामी महानगरपालिका निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्ष हाच मोठा पक्ष असेल व भाजपचाच महापौर होणार असल्याचे भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी काही दिवसापूर्वीच सांगितले आहे. तसेच आता भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष पद जेष्ठ नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्याकडे आहे व त्यांच्याच अध्यक्षतेखाली आता महानगरपालिकेच्या निवडणुका संपन्न होतील , शत्रुघ्न काटे यांच्या वर पक्षाने दिलेली जबाबदारी ते चांगल्या प्रकारे पूर्ण करतील असे काही राजकीय जाणकार सांगतात .

तर दुसरीकडे अजित पवार यांची राष्ट्रवादी पक्ष दुसऱ्या क्रमांकाची मोठी ताकद आहे राष्ट्रवादी पक्षाचे मागील महानगरपालिकेमध्ये निवडणुकीत 36 नगरसेवक निवडून आले होते परंतु आता राष्ट्रवादीचे दोन गट पाडल्याने अजित पवार यांची राष्ट्रवादी व शरद पवार यांची राष्ट्रवादी असे दोन पक्ष झाले आहेत यामध्ये अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची मोठी ताकद आहे या पक्षाचे शहराध्यक्ष योगेश बहल आहेत यांच्या मार्गदर्शनात विधानसभा निवडणुका संपन्न झाल्या व या विधानसभा निवडणुकीत पिंपरी विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादीचे आमदार अण्णा बनसोडे हे पुन्हा निवडून आले.

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षात जुने अनुभवी व जाणकार असे नगरसेवक आहेत तसेच अनेक वर्षे सत्तेमध्ये असणारे नेते अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडे आहेत त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरात राष्ट्रवादी हा भाजप खालोखाल दुसऱ्या क्रमांकाचा मोठा पक्ष ठरणार आहे.

मागील काळात काही नगरसेवक अजित पवार यांची राष्ट्रवादी सोडून शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत गेले ते गेलेले नगरसेवक ही अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत परत येणार असल्याच्या चर्चाही सध्या जोर धरत आहेत त्यामुळे अजित पवार यांची राष्ट्रवादी येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीत मोठी कामगिरी करेल यात शंका नाही असे काही जाणकारांचे मत आहे.

भाजप व अजित पवार यांच्या राष्ट्रवादी नंतर तिसरा क्रमांक लागतो तो शिंदे गटाच्या शिवसेनेचा शिवसेनेचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे व शिवसेनेचे उपनेते तथा कामगार नेते इरफान सय्यद यांच्यामुळे शिवसेनेची ताकद म्हणावी तशी मोठी आहे.

शहरातील हा आता तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष झाला आहे. मागील २०१७ च्या महानगरपालिका निवडणुकीत शिवसेनेचे नऊ नगरसेवक निवडून आले होते.

त्यानंतर शिवसेना पक्षाचे दोन गट झाले यामध्ये शिंदे गटाची शिवसेना याची ताकद मोठी आहे मावळ लोकसभा मतदारसंघात खासदार श्रीरंग बारणे यांनी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे उमेदवार संजोग वाघेरे यांचा पराजय केला. त्यानंतर शिंदे यांच्या शिवसेनेची मोट मोठ्या प्रमाणात शहरात बांधण्यात श्रीरंग बारणे यांना यश आल्या चे दिसते. पिंपरी चिंचवड शहरातील अनेक शिवसैनिक उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षातून शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करीत आहेत मागील काही दिवसांपूर्वीच शिवसेनेच्या संघटिका सुलभा उबाळे यांनीही शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. व कालच म्हणजे १५ मे रोजी उद्या सामंत यांच्या उपस्थितीत शिवसेना कार्यकर्ता मेळावा संपन्न झाला या मध्ये शिवसैनिकांमध्ये महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटना मजबूत करण्या वर भर दिला गेला त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरात शिंदे यांच्या शिवसेनेचा तिसरा क्रमांक लागतो.

राष्ट्रवादी पक्षाचे दोन गट झाले शरद पवार यांची राष्ट्रवादी पिंपरी चिंचवड शहरात सक्रिय आहे परंतु शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला म्हणावी तशी मोठी ताकद मिळाली नाही. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत अनेक मोठे नेते आहेत परंतु पिंपरी चिंचवड शहरातील शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत नवीन पदाधिकाऱ्यांना संधी देण्यात आली आहे यामध्ये जुने जाणते व अनुभवी असे नेते नाही त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरात शरद पवार यांची राष्ट्रवादी ही दुबळी मानली जाते. मागील विधानसभा निवडणुकीतही पिंपरी विधानसभा मतदारसंघात शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या उमेदवार यांना यश मिळविता आले नाही तसेच लोकसभा निवडणुकीच्या वेळी ही शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते फिके पडलेले पाहावयास मिळाले. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला पिंपरी चिंचवड शहरात सक्षम असे नेतृत्व न मिळाल्याने शरद पवार यांची राष्ट्रवादी आगामी महानगरपालिका निवडणुकीत काही मोठी मजल मारेल असे वाटत नाही. आगामी महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने शहर नेतृत्व बदलावे असे शहरातील काही नेतेमंडळी सांगत असतात सक्षम नेतृत्व नसल्यानेच शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला दुबळी राष्ट्रवादी म्हटले जाते.

पिंपरी चिंचवड शहरात शरद पवार यांच्या राष्ट्रवादी नंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचा नंबर लागतो. मागील 2017 च्या महानगरपालिका निवडणुकीत उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाच्या वतीने एकूण नऊ नगरसेवक निवडून आले होते त्यानंतर 2019 च्या निवडणुकीनंतर महा विकास आघाडीची स्थापना झाली व उद्धव बाळासाहेब ठाकरे हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले परंतु अडीच वर्षानंतर उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेतून एकनाथ शिंदे व त्यांच्या सोबत ४० आमदार महाविकास आघाडीतून बाहेर पडले व त्यांनी आपली शिवसेना खरी असल्याचे सांगत भाजप बरोबर जाऊन महाराष्ट्रात आपले सरकार स्थापन केले. त्यानंतर उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाला फार मोठी हानी सहन करावी लागली त्याचा परिणाम पिंपरी चिंचवड शहरातील उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षावरही झालेला आहे.

उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाला पिंपरी चिंचवड शहरात सक्षम असे नेतृत्व पहिल्यापासूनच राहिलेले नाही सचिन भोसले यांनी शिवसेनेला मोठी ताकद देण्याचे काम केले परंतु त्यांना तेवढे यश आले नाही त्यानंतर आता महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही दिवसापूर्वीच शहरात शिवसेनेचे नेतृत्व बदल करून शहराची धुरा माजी महापौर व मावळ लोकसभेसाठी शिवसेनेच्या वतीने उमेदवारी देण्यात आलेले संजोग वाघेरे यांच्याकडे आली आहे.

परंतु उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेत माजी आमदार गौतम चाबुकस्वार यांच्या सह काही मोजके नेते सोडले तर दुसऱ्या फळीतील नेतेमंडळींना मोठा अनुभव नाही तसेच शिंदे यांच्या शिवसेनेत जसे पक्षप्रवेश होत आहेत तसे पक्षप्रवेश उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षात पिंपरी चिंचवड शहरात नेते करत नाहीत उलट उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाला सोडून नेते मंडळी शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करीत असल्याने आगामी महानगरपालिका निवडणूकीत उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनापक्षाला मोठी कामगिरी करता येईल असे सध्या तरी वाटत नाही.

आता राहिला काँग्रेस पक्ष, देशात दुसऱ्या क्रमांकाचा मोठा पक्ष हा काँग्रेस पक्ष आहे परंतु पिंपरी चिंचवड शहरात काँग्रेस पक्षाचा नंबर हा खूप खाली आलेला आहे एकेकाळी काँग्रेस पक्षाची निर्विवाद सत्ता पिंपरी चिंचवड शहरात असताना पिंपरी चिंचवड शहराला वैभव मिळवून देणारा पक्ष म्हणून काँग्रेसचे नाव घेतले जाते परंतु सध्या शहरात काँग्रेसची स्थिती वाईट आहे. काँग्रेस पक्षाला मानणारा वर्ग पिंपरी चिंचवड शहरात मोठा असतानाही काँग्रेस पक्षाला पिंपरी चिंचवड शहरात मोठे नेते राहिलेले नाही.

काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम यांनी प्रथम शहराध्यक्षपद स्वीकारताना पक्षाला नवीन ताकद देण्याचे काम केले परंतु त्यांना ते जास्त दिवस करता आले नाही व सध्या काँग्रेस पक्षाला चांगले दिवस नाहीत.

मागील 2017 च्या महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेसला एकही नगरसेवक निवडून आणता आला नाही त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरात काँग्रेसचे अस्तित्व असूनही काँग्रेसकडे सक्षम असे नेतेमंडळी नसल्याने या आगामी महानगरपालिका निवडणूकीत काँग्रेसला कितपत यश मिळविता येईल यातही शंका आहे.

पिंपरी चिंचवड शहरात महाराष्ट्र नवनिर्माण सेना, वंचित बहुजन आघाडी, आम आदमी पार्टी, बहुजन समाज पार्टी यांच्या सह अनेक लहान लहान राजकीय पक्ष आहेत परंतु महानगरपालिका निवडणुकीत यश मिळविण्या इतपत या लहान लहान राजकीय पक्षांची ताकद नाही. आगामी महानगरपालिका निवडणुकीमध्ये भाजप हा सर्वात मोठा पक्ष म्हणून परत एकदा सत्ता स्थापन करेल असे एकंदरीत दिसत आहे तसेच दुसऱ्या क्रमांकावर अजित पवार यांची राष्ट्रवादी असेल व तिसऱ्या क्रमांकावर शिंदे यांची शिवसेना किंवा शरद पवार यांची राष्ट्रवादी असेल असे दिसते परंतु महानगरपालिका निवडणुकीला अजून चार महिने बाकी आहे या चार महिन्यात किती राजकीय समीकरणे बदलतील यावरच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर कोणता पक्ष सत्ता स्थापन करेल व कोणता पक्ष विरोधी पक्ष म्हणून राहील हे आत्ताच सांगणे कठीण आहे.



# भूमि अभिलेख विभागाच्या कामकाजात सूसुत्रता!

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आदेश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधीभूमी अभिलेख कार्यालय ता. हवेली जि. पुणे अंतर्गत येणारी पुणे ग्रामीण हद्दीतील काही गावे शहरी नगर भूमापन कार्यालय पिंपरी-चिंचवड यांचेशी संलग्न करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. त्यामुळे शहरातील भूमि अभिलेख संदर्भातील कामकाजात गतीमानता आणि सूसुत्रता येणार आहे.विशेष म्हणजे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका स्थापन झाल्यापासून भूमापन व भूमिअभिलेख कार्यालयाची सूसुत्रता करावी, अशी मागणी प्रलंबित होती. त्याला आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्यामुळे यश मिळाले आहे.पिंपरी-चिंचवड महापालिका परिसरातील ग्रामीण हद्दीतील गावे नगर भूमापन कार्यालयाशी संलग्न करावी करावीत, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी मुंबई येथील विधीमंडळ अधिवेशन दरम्यान राज्याचे महसूल मंत्री





चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली होती. याबाबत महसूल मंत्री बावनकुळे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि जमाबंदी आयुक्त यांना सात दिवसांत प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत. प्रस्ताव प्राप्त करुन शासन निर्णय निर्गमित केले करण्यात येणार आहे.आमदार महेश लांडगे म्हणाले की, भूमि अभिलेख हवेली कार्यालयात क्षेत्रात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील काही गावे यापूर्वी येत होती. मागील काही कालावधीमध्ये काही गावे अभिलेख सहीत पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालयाअंतर्गत संलग्न केलेली आहेत. त्याचप्रमाणे भूमी अभिलेख हवेली कार्यालयातील उर्वरित गावे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत असून, सदर गावे नगर भूमापन कार्यालय पिंपरी-चिंचवड या कार्यालयाशी संलग्न करण्यात यावे, अशी मागणी आम्ही केली होती. त्याला यश मिळाले आहे.

शहरातील बोपखेल, दिघी, वडमुखवाडी, चऱ्होली, चोवीसावाडी, डूडूळगाव, मोशी, चिखली, देहु, किन्हई, रावेत, मामुर्डी, किवळे आदी गावे नगर भूमापन अभिलेख पिंपरी-चिंचवड कार्यालयाशी संलग्न करण्यात येणार आहेत.

### पिंपरी-चिंचवड नगर भूमापन कार्यालय क्षेत्राचा विस्तार...

**“ पिंपरी-चिंचवड महानगर पालिका हद्दीत हवेली तालुक्यातील एकूण 30 गावे आणि मुळशी तालुक्यातील 3 गावांचा समावेश नगर भूमापन अधिकारी कार्यालयाअंतर्गत करण्यात येणार आहे. त्यापैकी 12 गावांचे पूर्ण क्षेत्र आणि किवळे, रावेत, मोशी, चिखली, देहू, तळवडे या 6 गावांतील अंशत: क्षेत्र व मुळशी तालुक्यातील वाकड असे एकूण 7 गावांतील अंशत: क्षेत्राचा समावेश आहे. यापैकी 11 गावांचा पूर्णत: समावेश करण्यात येणार आहे. याबाबत लवकरच राज्य शासनाच्या स्तरावर अधिसूचना निर्गमित करण्यात येणार आहे. ”**

**“ पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना जमीन मोजणीकरिता तसेच प्रॉपर्टी कार्ड या कामासाठी हवेली भूमीलेख कार्यालयामध्ये जावे लागते. त्यामुळे नागरिकांची पायपीट होऊन आर्थिक वेळेचे नुकसान होते सर्वांना एकाच ठिकाणी सर्व सरकारी सुविधा मिळण्याकरिता सोयीचे होईल. यासंदर्भात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्याचे जमाबंदी आयुक्त यांना तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. याबाबत मंत्रीमहोदय यांचे आभार व्यक्त करतो. ”**

**महेश लांडगे**, आमदार, भाजपा

# YCM रुग्णालयातील पदव्युत्तर एम.डी./एम.एस.परीक्षेचा निकाल जाहीर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, चिंचवड महानगरपालिकेच्या पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील सन २०२१ च्या पदव्युत्तर एम.डी./एम.एस. या अभ्यासक्रम परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या अभ्यासक्रमातील एकूण ३३ पैकी २१ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. यापैकी राज्यात अव्वल क्रमांक पटकावत डॉ. प्रीत शहा आणि डॉ. रवी केसवानी हे ‘गोल्ड मेडलिस्ट’ ठरले आहेत. यानिमित्ताने सन २०२१ बॅचचा निरोप समारंभ पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या उपस्थितीत पार पडला.

या वेळी बोलताना आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सर्व यशस्वी डॉक्टरांचे विशेष अभिनंदन केले. तसेच सर्जरी, मेडिसिन व बालरोग या तीन विभागांतील




नेत्रदीपक यश मिळवणाऱ्या डॉक्टरांचे विशेष कौतुक केले. या प्रसंगी सहानुभूती, मानवीय दृष्टीकोन व नैतिक मूल्ये ठेवून रुग्णसेवा करण्याचा सल्ला देखील आयुक्त सिंह यांनी सर्व डॉक्टरांना दिला.

महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठाद्वारे घेतल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय परीक्षेत जनरल सर्जरी विभागातील ६ पैकी ६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या विभागातील डॉ. प्रीत शहा राज्यात पहिल्या क्रमांकावर असून ‘गोल्ड मेडलिस्ट’ रठरले आहेत. तसेच, डॉ. अजिंक्य आक्रे यांनी राज्यात पाचवा क्रमांक मिळविला आहे.

जनरल मेडिसिन विभागात ३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून डॉ. रवी केसवानी हा राज्यात पहिला क्रमांक पटकावत गोल्ड मेडलिस्ट ठरला आहे. तर बालरोग विभागात ४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून डॉ. मेहेरीन मीर हा राज्यात दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. तसेच कान-नाक-घसा विभागात ३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून डॉ. मनोज्ञा जाळवी या राज्यात सातव्या क्रमांकावर उत्तीर्ण झाल्या आहेत. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे यांनी यशस्वी डॉक्टरांचे अभिनंदन करताना त्यांच्या पाठीशी उभे राहणाऱ्या पालक व मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांचे आभार मानले. तसेच भावी आयुष्यात आरोग्य सेवेत कार्यरत घटकांशी योग्य संवाद साधून यशस्वी होण्याच्या शुभेच्छा दिल्या. तर अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार यांनी सर्व डॉक्टरांनाc शुभेच्छा देताना कामामध्ये पैसा सर्वोपरी न ठेवता कामाचे समाधान सर्वोपरी ठेवावे असा सल्ला दिला.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक १७/05/२०२५


पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# आजी-माजी पदाधिकाऱ्यांचा समतोल राखून संघटन मजबूत करणार

## पक्षात कोणाचीही नाराजी नाही; 20 दिवसांत नवीन कार्यकारिणी जाहीर करणार

## भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड : भारतीय जनता पार्टीच्या पिंपरी-चिंचवड शहराध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर शत्रुघ्न (बापू) काटे यांनी आज अधिकृतपणे शहराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला. मोरवाडी येथील भाजपा मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या समारंभात, पिंपरी चिंचवड जिल्हा निवडणूक निरीक्षक आमदार सिद्धार्थ शिरोळे यांच्या हस्ते मावळते शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्याकडून त्यांनी हे पद स्वीकारले.

**मावळते शहराध्यक्ष तथा आमदार शंकर जगताप यांनी नवनियुक्त अध्यक्षांना शुभेच्छा दिल्या. "शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष अधिक उंची गाठेल. त्यांनी आतापर्यंत केलेले कार्य खूप चांगले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी-चिंचवड शहरामध्ये भारतीय जनता पार्टी अधिक मजबूत होईल," असे आमदार शंकर जगताप म्हणाले.**

कार्यक्रमात बोलताना शत्रुघ्न काटे यांनी पक्षाने सोपवलेल्या जबाबदारीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. "पक्षाने माझ्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण तसेच चंद्रकांत दादा पाटील यांच्या नेतृत्वात तसेच मावळते शहराध्यक्ष तथा आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, आमदार अमित गोरखे, आमदार उमाताई खापरे यांच्या मार्गदर्शनाखाली संघटना अधिक मजबूत करण्यावर भर राहील. शहरातील 4500 सक्रिय सदस्य आणि 3 लाख प्राथमिक सदस्यांच्या सहकार्याने संघटन वाढविण्याचे काम करणार असून, जनता दरबाराच्या माध्यमातून जनतेची कामे मार्गी लावण्यास प्राधान्य राहील. गेल्या तीन वर्षांपासून जनतेची कामे निरंतर सुरू असून, आगामी महापालिका निवडणुका ताकदीने लढवल्या जातील. पक्षात कोणाचीही नाराजी नसून, शहरातील आमदार आणि माजी पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संघटना काम करेल.

पक्षात दूजाभाव होणार नाही, याची दक्षता घेऊन पुढील 20 दिवसांच्या कालावधीत कार्यकारिणी गठित केली जाईल," असे नवनियुक्त शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे म्हणाले.

यावेळी, आमदार महेश लांडगे म्हणाले, "शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी-चिंचवड शहरात भारतीय जनता पार्टी अधिक मजबूत होईल."




आमदार उमाताई खापरे म्हणाल्या की, "शत्रुघ्न काटे यांच्या अनुभवाचा संघटनेला निश्चितच फायदा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. आमदार अमित गोरखे म्हणाले ; "शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखाली संघटना अधिक गतिमान होईल." माजी आमदार अश्विनी जगताप शुभेच्छा देत म्हणाल्या; "शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी चिंचवड शहर विकासाच्या दिशेने वाटचाल करेल."

याप्रसंगी आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, आमदार उमाताई खापरे, आमदार अमित गोरखे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार अश्विनी जगताप, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, माऊली थोरात, महेश कुलकर्णी, चंद्रकांत नखाते, संतोष कलाटे, दक्षिण आघाडी प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, राहुल जाधव, मनोज तोरडमल, सरचिटणीस संजय मंगोडेकर, विलास मडेगिरी, शीतल शिंदे, अजय पाताडे, शैला मोळक, महिला मोर्चा अध्यक्ष सुजाता पालांडे, प्रदेश सचिव तेजस्विनी कदम, युवा मोर्चा अध्यक्ष राज तापकीर, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, काळूराम बारणे, माजी स्थायी समिती अध्यक्ष संतोष लोंढे, नितीन लांडगे, माजी नगरसेवक राजेंद्र लांडगे, राजेंद्र गावडे, हर्षल ढोरे, विकास डोळस, सागर गवळी, हर्षल ढोरे, संदीप कस्पटे, नगरसेविका माधुरी कुलकर्णी, शारदा सोनवणे, उपाध्यक्ष कैलास सानप, बिभीषण चौधरी, प्रदेश सदस्य कविता हिंगे, जयनाथ काटे, मंडल अध्यक्ष सोमनाथ तापकीर, गणेश ढोरे, सनी बारणे, ॲड. हर्षल नढे, मोहन राऊत, जयदीप खापरे, मंगेश धाडगे, गणेश वाळुंजकर, ॲड. योगेश सोनवणे, रामदास कुटे, योगेश सोनवणे, अमोल डोळस, शिवराज लांडगे, संकेत चोंधे, राजेंद्र बाबर, सोमनाथ भोंडवे, योगेश चिंचवडे, दीपक भोंडवे, विजय फुगे, महिला मोर्चा सरचिटणीस वैशाली खाडये, पल्लवी मारकड, डॉ. तृप्ती परदेशी, नामदेव पवार, मधुकर बच्चे, गणेश आर. ढाकणे, देविदास पाटील, देवदत्त लांडे, जवाहर ढोरे, हिरेन सोनवणे, दत्ता यादव, चैतन्य देशपांडे, अभिजित बोरसे, देविदास साबळे, कुणाल लांडगे, गणेश वाळुंजकर, आदेश नवले, खंडूदेव कथोरे, दत्ता ढगे, प्रीती कामतीकर, सुप्रिया चांदगुळे, राजश्री जायभाय, गीता महेंदू, आशा काळे, सीमा चव्हाण, रोहिणी रासकर, पुष्पा सुबंध, अंतरा देशपांडे, दिपाली कलापुरे, शोभा भराडे, पोपट हजारे, प्रदीप बेंद्रे, भूषण राऊत, आनंद देशमुख, सचिन राऊत, संजय पटनी, विजय शिनकर, बबन डांगले, अर्जुन ठाकरे, दत्ता गव्हाणे, मनोज ब्राह्मणकर, कीर्ती परदेशी, कोमल शिंदे, प्रतिभा जवळकर, मनिषा शिंदे, सागर फुगे, डॉ. प्रताप सोमवंशी, सीमा बोरसे यांच्यासह शहरातील प्रमुख नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968